लोकमत

# ऑनलाईन पर्याय परीक्षेसाठी निवडा

कोल्हापूर : कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने शिवाजी विद्यापीठाच्यावतीने सर्व परीक्षा ऑनलाईन स्वरूपात घेण्यात येणार आहेत. त्यामुळे यापूर्वी सुमारे ३१३६ विद्यार्थ्यांनी परीक्षा देण्यासाठी ऑफलाईन पर्याय निवडला होता. त्यामध्ये विद्यापीठ अधिविभाग, संलग्नित महाविद्यालये आणि दूरशिक्षण केंद्राकडील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. अशा सर्व विद्यार्थ्यांनी परीक्षा देण्यासाठी ऑनलाईन पर्यायाची निवड करावी.

हा पर्याय निवडण्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर शनिवारी (दि. १५) सायंकाळी पाच वाजेपर्यंत सुविधा उपलब्ध असणार आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांनी ऑनलाईनचा पर्याय संगणक प्रणालीमध्ये नोंद करावा, असे आवाहन गजानन पळसे यांनी केले.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाच्या १९ परीक्षांचे निकाल

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या बी.जे., बी.एस्सी., एम.कॉम., झूलॉजी अशा विविध १९ परीक्षांचे ऑनलाईन निकाल परीक्षा व मूल्यमापन मंडळाने बुधवारी जाहीर केले. आतापर्यंत एकूण ११७ परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत. एम.ए., एम.एस्सी., बी.एस्सी., बी.ए. या अभ्यासक्रमांची हिवाळी सत्रातील परीक्षा १२५३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

या परीक्षा मंडळाने बुधवारी बी.जे. सत्र दोन, बी.एस्सी. एम.टी.एम. सत्र तीन, एम.कॉम. व्हॅल्युऐशन रियल इस्टेट सत्र दोन, झुलॉजी सत्र दोन, अॅनॉलिटीकल केमिस्ट्री सत्र दोन व तीन, बॉटनी सत्र चार, एमआरएस सत्र दोन ते चार, बी.ए. ड्रेस मेकिंग सत्र तीन, बी. आर्किटेक्चर सत्र तीन, पाच आणि सात, फिजिकल केमिस्ट्री आणि ऑरगॅनिक केमिस्ट्री सत्र दोन व तीन, अॅग्रो केमिकल अँड पेस्ट मॅनेजमेंट या अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल जाहीर केले. विविध चार अभ्यासक्रमांसाठी बुधवारी झालेल्या ऑनलाईन परीक्षेसाठी एकूण १७४२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १२५३ जणांनी परीक्षा दिली. हिवाळी सत्रातील परीक्षांसाठी ज्या विद्यार्थ्यांनी ऑफलाईन पर्याय निवडला होता त्यांना परीक्षेसाठी ऑनलाईन पर्याय निवडण्यासाठी शनिवार(दि. १५)पर्यंत मुदत आहे.



## संगणकप्रणालीमध्ये गुण भरावेत

ऑक्टोबर-नोव्हेंबरच्या बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी आणि इतर अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या परीक्षा महाविद्यालयीन स्तरावर होत आहेत. या प्रथम वर्ष प्रथम सत्र आणि द्वितीय सत्राच्या विद्यार्थ्यांच्या लेखी परीक्षांच्या गुणांची नोंद सोमवार (दि. १७)पर्यंत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर करावी, असे आवाहन परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी केले.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात ऑनलाईन प्रशिक्षण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त सुविधा केंद्रातर्फे (कॉमन फॅसिलिटी सेंटर) राष्ट्रीय तंत्रज्ञान दिनानिमित्त रामन स्पेक्ट्रोमीटर वापराबाबत विशेष ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात आले. रामन स्पेक्ट्रोमीटर हे पदार्थ विश्लेषणात्मक अभ्यासासाठी एक तंत्रज्ञान आहे. अधिविभागातील संशोधक विद्यार्थ्यांना याविषयी सखोल ज्ञान मिळावे या उद्देशाने प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षणाअंतर्गत रेनिशॉ यूके सेल्स लिमिटेडचे अभियंते युवराज पाटील यांनी बेंगलोर येथून संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पदार्थविज्ञान अभ्यासाच्या दृष्टीने उपकरण अधिक प्रभावीपणे कसे वापरता येईल, यासंदर्भात मार्गदर्शन केले. कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे विद्यापीठ व अधिविभाग बंद असताना विद्यार्थ्यांची संशोधकीय मानसिकता विचलित होऊ नये, यासाठी अशा सहज आणि मूलभूत उपक्रमांचे महत्त्व ओळखत विद्यापीठाने हे प्रशिक्षण आयोजित केले. कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर येथील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असल्याची माहिती सीएफसी विभागप्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी दिली.

पुढारी

# राष्ट्रीय तंत्रज्ञान दिनानिमित्त विद्यार्थ्यांना रामन स्पेक्ट्रोमीटरचे ऑनलाईन प्रशिक्षण

कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) : राष्ट्रीय तंत्रज्ञान दिनाचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त सुविधा केंद्राच्या वतीने (सीएफसी) रामन स्पेक्ट्रोमीटरचे विद्यार्थी, संशोधकांना ऑनलाईन पद्धतीने प्रशिक्षण देण्यात आले. 'रामन स्पेक्ट्रोस्कोपी' हे पदार्थ विश्लेषणात्मक अभ्यासासाठी एक महत्त्वपूर्ण तंत्रज्ञान आहे. अधिविभागातील संशोधक विद्यार्थ्यांना याविषयी सखोल ज्ञान मिळावे, या उद्देशाने प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्रशिक्षणाअंतर्गत अभियंते युवराज पाटील यांनी बेंगळूर येथून संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी उपकरणाची रचना, कार्यपद्धती याबद्दल माहिती दिली. पदार्थविज्ञान अभ्यासाच्या दृष्टीने उपकरण अधिक प्रभावीपणे कसे वापरता येईल, यासंदर्भात चर्चा झाली.

सकाळ

# रामन स्पेक्ट्रोमीटरचे प्रशिक्षण शिवाजी विद्यापीठात ऑनलाईन

## सुविधा केंद्रातर्फे राष्ट्रीय तंत्रज्ञान दिनानिमित्त आयोजन

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त सुविधा केंद्रातर्फे (कॉमन फॅसिलिटी सेंटर) राष्ट्रीय तंत्रज्ञान दिनानिमित्त रामन स्पेक्ट्रोमीटर वापराबाबत विशेष ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात आले. रेनिशॉ युके सेल्सचे अभियंते युवराज पाटील यांनी बंगळुरू येथून दोन दिवस संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

पाटील यांनी उपकरणाची रचना, कार्यपद्धतीबद्दल सविस्तर माहिती दिली. पदार्थविज्ञान अभ्यासाच्यादृष्टीने उपकरण अधिक प्रभावीपणे कसे वापरता येईल याबाबतही मार्गदर्शन केले. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे विद्यार्थ्यांची संशोधकीय मानसिकता विचलित होऊ नये, यासाठी सहज आणि मुलभूत उपक्रमांचे महत्त्व ओळखत विद्यापीठाने आयोजन केल्याबद्दल त्यांनी कौतुक केले. प्रशिक्षणाचा लाभ कोल्हापूरसह सांगली, सातारा आणि सोलापूर येथील विद्यार्थ्यांनीही घेतला. सीएफसी विभागप्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी आयोजन केले.



### तीन महत्त्वाचे दिवस

भारताचे महान भौतिकशास्त्रज्ञ सर चंद्रशेखर वेंकटरामन यांनी २८ फेब्रुवारी १९२८ रोजी रामन इफेक्टचा शोध लावला. त्यासाठी त्यांना नोबेल पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले. ३० ऑक्टोबर १९०९ हा भारताचे आण्विक शिल्पकार डॉ. होमी भाभा यांचा जन्मदिवस. तसेच, डॉ. कलाम यांच्या मार्गदर्शनाखाली ११ मे १९९८ रोजी पोखरण येथे भारताने दुसरी अणुचाचणी यशस्वी केली. भारताच्या वैज्ञानिक वाटचालीतील महत्त्वाच्या तीन घटनांच्या सन्मानार्थ देशभरात २८ फेब्रुवारी रोजी ''राष्ट्रीय विज्ञान दिवस'', ३० ऑक्टोबर रोजी 'राष्ट्रीय शास्त्रज्ञ दिवस'' तर ११ मे रोजी ''राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवस'' साजरा केला जातो.

तरुण भारत

# प्रथम वर्ष लेखी परीक्षा गुण त्वरित भरा : पळसे

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयांमधील पदवी प्रथम वर्षाच्या लेखी परीक्षा शनिवार १५ मे रोजी पूर्ण होणार आहेत. त्यामुळे सोमवार १७ मेपर्यंत या परीक्षेचे गुण विद्यापीठाच्या संगणक प्रणालीमध्ये भरावेत. यामध्ये पदवी प्रथम वर्ष प्रथम व व्दितीय सत्रांचा समावेश आहे, अशा सूचना शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी महाविद्यालयांना दिल्या आहेत. पदवी प्रथम वर्षाच्या परीक्षा महाविद्यालय पातळीवर ऑनलाईन पद्धतीने सुरू आहेत. या परीक्षा १५ मेपर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना विद्यापीठाने महाविद्यालय प्रशासनाला दिल्या आहेत. बहुतांश महाविद्यालयांच्या लेखी परीक्षा संपत आल्या. तर काही महाविद्यालयांच्या परीक्षा संपल्या आहेत. परंतू अद्याप संगणक प्रणालीमध्ये गुण भरलेले दिसत नाहीत, त्यामुळे १७ मे पर्यंत गुण भरण्याच्या सूचना दिल्या. भरलेल्या गुणांची हार्ड कॉपी रजिस्टर पोस्टाने विद्यापीठाला पाठवणे बंधनकारक आहे. प्रात्यक्षिक परीक्षेच्या गुणांच्या नोंदी याप्रमाणेच करावयाच्या आहेत.